# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०५/०५/२०१८

**मनमाड शहरात IPL मॅचवर सट्टा लावणारे इसमांवर छापा**
**ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाची कारवाई**

---

जिल्हयातील अवैध धद्यांचे समुळ उच्चाटन होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे आदेशान्वये धडक कारवाई सुरू आहे. सध्या सुरू असलेलया आय.पी. एल. सामन्यांदरम्यान लाईव्ह मॅच पाहुन लोकांकडुन पैशांची बोली लावुन सट्टा खेळणारे व खेळविणारे इसमांवर सत्वर कारवाई करणेबाबत मा.पोलीस अधीक्षकांनी ओदशित केले होते. त्यानुसार नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे विशेष पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मनमाड शहरातील हनुमान नगर परिसरात आय.पी.एल. मॅचवर सट्टा लावणारे इसमांवर छापा टाकुन सुमारे १ लाख ९१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दिनांक ०४/०५/२०१८ रोजी आय.पी.एल. मालिकेत किंग्स इलेव्हन पंजाब व मुंबई इंडियन्स या संघांचा क्रिकेट सामना सुरू होता, दरम्यान मनमाड शहरात सदर सामन्यावर बेटींग सुरू असल्याची माहिती विशेष पथकाचे पोउनि गडाख यांना मिळाली होती. त्यानुसार पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मनमाड शहरातील हनुमान नगर परिसरात इसम नामे सुनिल हांडगे यांचे राहते घरातील खोली मध्ये छापा टाकला. सदर ठिकाणी इसम नामे **१) सुनिल पुंडलीक हांडगे,** रा. हनुमान नगर, मनमाड**, २) अफजल बुडान शेख,** रा. आठवडे बाजार, हुसैनी चौक, मनमाड यांना जागेवरच ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेले इसम हे त्यांचे साथीदारांसह वरील आय.पी.एल. सामन्यावर त्यांचे ताब्यातील लॅपटॉप व मोबाईलव्दारे लोकांकडुन पैसे लावुन घेवुन सट्टा खेळतांना व खेळवितांना मिळुन आले. सदर छाप्यात ताब्यात घेतलेले इसमांचे कब्जातुन विविध कंपन्यांचे **११ मोबाईल स्मार्टफोन, लॅपटॉप, कॅल्क्युलेटर, ब्लुटूथ स्पिकर, चेक बुक,** तसेच आय.पी.एल. बेटींगसाठी लावण्यात आलेले अंक आकडे लिहिलेले कागद असा **एकुण १,९१,४००/- रू.** चा **मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे. वरील आरोपीतांचे इतर साथीदार नामे ३) सागर केकान, ४) संजु पाटील, ५) सागर गांगुर्डे असे पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेले असुन वरील सर्व आरोपीतांविरूध्द **मनमाड शहर पोलीस ठाणेस मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा** दाखल करण्यात आलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे विशेष पोलीस पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री. गडाख, पोना सुनिल पवार, आहेरराव, मंडलीक अशांचे पथकाने सदर कारवाई केली असुन आगामी काळात अशाचप्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.